महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२० / २८८ दिनांक : 21 OCT 2020

**कालमर्यादा दि.२३.१०.२०२०**

प्रति,
प्राचार्य/संचालक
सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.....

संदर्भ : संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०२०/१८८,दि.३०.७.२०२०

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ वर्षासाठी पदविका, पदवी, आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अचूक व अद्ययावत असणे आवश्यक असण्याच्या दृष्टीकोनातून संस्थांची शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठांकडून/परीक्षा मंडळाकडून संलग्नीकरण प्रदान केल्याची माहिती http://dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर माहिती अद्ययावत करण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये कळविण्यात आलेले होते. तथापि काही संस्थांनी त्यांची माहिती अद्ययावत केलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

सबब सर्व संस्थाप्रमुखांना या द्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त संकेतस्थळावर असलेली संस्थेची माहिती अद्ययावत असल्याची खात्री करावी. सदर माहितीत काही बदल असल्यास संबंधित संस्थेने दिनांक २३.१०.२०२० रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत संबंधित विभागीय कार्यालयांच्या निदर्शनास आणून ती प्रमाणित करुन घ्यावी. ज्या संस्थांना बदल करावयाचा आहे त्या संस्थांनी संबंधित विभागीय कार्यालयाशी संपर्क करुन सदरहू लिंक उपलब्ध करुन घ्यावी. या कालावधीपर्यंत संस्थांनी सादर केलेली व विभागीय कार्यालयांनी प्रमाणित केलेली माहिती अंतिम समजून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशांकरिता ग्राहय धरण्यात येईल. सदरहू कालावधीत संस्थांकडून माहिती अदययावत करण्याबाबत कार्यवाही करण्यात न आल्यास आणि ती माहिती केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी उपयोगात आणताना त्यामध्ये कोणतीही चूक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्था जबाबदार असेल.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १. मा.आयुक्त , राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित

२. सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर - त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व संस्थांच्या निदर्शनास आणून दयावे तसेच संस्थांनी माहितीत बदल करण्याबाबत विनंती केल्यास सदर लिंक आपल्या स्तरावरुन उपलब्ध करुन दयावी. संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन ती माहिती प्रमाणित करुन संकेतस्थळावर दिनांक २६.१०.२०२० पर्यंत अद्ययावत करावी व त्याबाबतचा अंतिम अहवाल संचालनालयास सादर करावा.

३. कार्यासन क्रमांक ३(माहिती तंत्रज्ञान कक्ष),मुख्य कार्यालय,मुंबई- यांना कळविण्यात येते की, विभागीय कार्यालयांकडून पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या संस्थांबद्दलची प्रमाणित केलेली माहिती राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना सादर करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

E:\Budage\2020-21\General Correspondence\Letter to RO and Institute to verify the institute information.docx